संगणक संकेतांक २०१०१०२०१७४२४०००१

महाराष्ट्र जैवतंत्रज्ञान धोरणांतर्गत
विशेष जैवतंत्रज्ञान निधी उभारण्यास
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र.बीटीएच २००१/(५०७८)/उद्योग-२
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ ऑक्टोंबर,२००२

वाचा :- १) शा.नि.क्र.बीटीएच २००१/(५०५८)/उद्योग-२, दि. २९.१.२००२
2) शा.नि.क्र.बीटीएच २००१/(५०७८)/उद्योग-२, दि. ७.६.२००२,
३) शा.नि.क्र.बीटीएच २००१/(५०५८)/उद्योग-२, दि. २०.८.२००२

पूर्वपीठीका :-

वनस्पती, प्राणी तसेच सूक्ष्मजीव यांसह सजीव प्रणालींशी संबंधित असलेल्या जैवतंत्रज्ञानाचा महाराष्ट्र राज्यात विकास, प्रचार व प्रसार होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्राचे जैवतंत्रज्ञान धोरण-२००१ वरील क्र.१ येथील शासन निर्णयाद्वारे जाहीर केले. महाराष्ट्र हे जैव तंत्रज्ञानातील आघाडीचे राज्य होण्याचे उद्दीष्ट सफल होण्यासाठी, जैवतंत्रज्ञान धोरणाची व्यापक व प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी वरील क्र.२ नुसार महाराष्ट्र जैवतंत्रज्ञान मंडळाची तसेच क्र.३ नुसार महाराष्ट्र जैवतंत्रज्ञान आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या जैवतंत्रज्ञान धोरणात उल्लेख केल्यानुसार जैवतंत्रज्ञान विकास निधी उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यात जैवतंत्रज्ञानाचा विकास होण्यासाठी रु. ५०/- कोटी (रु.पन्नास कोटी फक्त) रकमेच्या विशेष जैवतंत्रज्ञान विकास निधी सार्वजनिक व खाजगी सहकार्यातून उभारण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. जैव तंत्रज्ञान क्रांतीमुळे लाभ होईल अशा शासनाच्या विविध संबंधित विभागांकडून केलेल्या वार्षिक योजना निधीतून १ टक्का निधी दरवर्षी उपलब्ध करण्यात यावा. जैवतंत्रज्ञान विकास निधी परदेशातून प्राप्त होणारी अनुदाने व देणग्या यामुळे वाढण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. महाराष्ट्र जैवतंत्रज्ञान आयोगाने जैवतंत्रज्ञान विकास निधीचा सुयोग्य विनियोग करावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७६९/२००२, दिनांक १७.१०.२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( आ.बा.कांबळे )
शासनाचे सह सचिव

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री
मुख्य सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
डॉ.रघुनाथ माशेलकर, केंद्रीय सचिव, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन विभाग आणि अध्यक्ष, महाराष्ट्र जैव तंत्रज्ञान आयोग, नवी दिल्ली.
सर्व मंत्रालयीन विभाग
विकास आयुक्त (उद्योग)
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
उद्योग,ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती (उद्योग-२)

---